**ठळक बातम्या**

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यात पश्चिम विभागीय परिषदेची बैठक

- जालन्यात वाळूच्या ढिगाऱ्या खाली दबल्यानं ५ मजूरांचा मृत्यू

- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून तिन्ही सेनादलांच्या संयुक्त प्रमुखांची हकालपट्टी, नौदल आणि हवाईदलाच्या २ वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही हटवलं

**आणि**

- महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेत आज यूपी वॉरियर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना

**<><><><><><>**

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर असून गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची २७ वी बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या राज्यांसह दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री, प्रशासक, वरिष्ठ मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी या परिषदेला उपस्थित आहेत. जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभालाही शहा उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या पुणे जिल्ह्यातल्या लाभार्थ्यांना अमित शहा यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात मंजुरी पत्र वितरण दिलं जाईल. तसंच राज्यातल्या १० लाख लाभार्थ्यांना या योजनेच्या पहिल्या हप्त्याचं वितरणदेखील यावेळी करण्यात येईल. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६५व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. पीएम उषा प्रकल्पातंर्गत बांधण्यात आलेल्या विद्यापीठाच्या चार इमारतींचं भूमिपूजन, तसंच संविधान जागृती वर्षाच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमाचं उद्घाटनही उपराष्ट्रपती करणार आहेत.

**<><><><><>**

'शेती हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आणि जीवनरेखा आहे', असं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी केलं आहे. 'पुसा-कृषी विज्ञान मेळा' आज नवी दिल्ली इथं सुरु झाला. या मेळ्याचं उदघाटन चौहान यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. 'उन्नत कृषी आणि विकसित भारत' असं या मेळ्याचं उद्दिष्ट्य आहे.

**<><><><><>**

शस्त्रबंदी कायम ठेवणं आणि भविष्यात गैरसमज टाळण्यावर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सहमती झाली आहे. जम्मू - काश्मिरातल्या पूंछमध्ये दोन्ही देशांच्या ब्रिगेड कमांडरच्या बैठकीत ही चर्चा झाली. सुमारे ४ वर्षांनंतर अशा प्रकारची बैठक झाली. नुकतीच झालेली चकमक आणि ताबारेषेवर आढळून आलेल्या बॉम्बची पार्श्वभूमी या बैठकीला होती. दोन्ही देशातला तणाव कमी करण्यासाठी विद्यमान संपर्क यंत्रणांचा प्रभावी वापर करण्याचा निर्णयही दोन्ही देशांनी घेतला.

**<><><><><>**

उत्तराखंड विधानसभेनं राज्यात अनियंत्रित जमीन खरेदी-विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी कायदा संमत केला आहे. यामुळे राज्यांतल्या अनियंत्रित जमीन व्यवहारांचं नियमन केलं जाणार आहे.

<><><><><>

जालना जिल्ह्यातल्या जाफराबाद तालुक्यातल्या पासोडी इथं आज पहाटेच्या सुमारास टिप्परमधली वाळू काढत असताना पत्र्याच्या शेडजवळ झोपलेल्या पाच मजुरांचा दबून मृत्यू झाला. हे मजूर पासोडी रस्त्यावरच्या पुलाच्या बांधकामासाठी आले होते आणि पत्र्याची शेड करून राहत होते. अवैध वाळू वाहतुकीच्या टिप्पर चालकानं घाईनं टिप्पर रिकामा करताना झोपलेल्या मजुरांना पाहिलं नाही, त्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली. वाळूच्या ढिगाऱ्याखालून गावकऱ्यांनी एका लहान मुलीला सुखरूप बाहेर काढलं असल्याचं वृत्त आहे. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीनं जेसीबीच्या सहायानं वाळू बाजूला घेतली. त्यानंतर मृतदेह पुढच्या तपासणीसाठी पाठवले असून या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जालन्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी दिल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तिन्ही सेनादलांचे संयुक्त प्रमुख हवाई दलाचे जनरल C Q ब्राऊन ज्युनियर यांना अचानक पदावरुन दूर केलं. गेले १६ महिने ते या पदावर कार्यरत होते आणि गेल्या ४० वर्षांपासून हवाई दलाच्या सेवेत होते. ते कृष्णवर्णीयांच्या हक्कांचे समर्थक होते. त्यांच्या जागी ट्रम्प यांनी हवाई दलातून निवृत्त झालेले लेफ्टनंट जनरल डान रेझिन केन यांची नियुक्ती केली आहे. काही काळापूर्वी ते CIA मध्ये लष्करी व्यवहारविषयक सह संचालक म्हणून कार्यरत होते. याशिवाय नौदलाच्या कारवाई विभागाचे प्रमुख ॲडमिरल लिसा

फ्रानचेट्टी आणि हवाई दलाचे उप प्रमुख जनरल जिम स्लाइफ यांनाही ट्रम्प यांनी काढून टाकलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत विविधता, समता, आणि समावेशन कार्यक्रमांसाठी सरकारी निधी कमी करण्याच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशाला फेडरल न्यायाधीशांनी स्थगिती दिली आहे. हा आदेश अभिव्यक्ती स्वातंत्र्याचं उल्लंघन करत असून खटला सुरू असेपर्यंत तो स्थगित राहील, असं बाल्टिमोरचे न्यायाधीश ॲडम अबेलसन यांनी हा निर्णय देताना म्हटलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून पहिल्याच दिवशी या आदेशावर स्वाक्षरी केली होती.

**<><><><><>**

प्रसिद्ध ब्रिटिश- भारतीय लेखक सलमान रश्दी यांच्यावर चाकूनं हल्ला करणाऱ्या हादी मतारला न्यूयॉर्क न्यायालयानं दोषी ठरवलं आहे. २३ एप्रिल रोजी न्यायालय मतारला शिक्षा सुनावणार असून त्याला ३० वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो. ऑगस्ट २०२२ मध्ये न्यू यॉर्कमध्ये एका कार्यक्रमा दरम्यान हा हल्ला झाला होता. या हल्ल्यात रश्दी गंभीर जखमी झाले होते.

**<><><><><>**

भारतीय वंशाचे काश पटेल यांनी अमेरिकेच्या FBI अर्थात फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनचे ९ वे संचालक म्हणून शपथ घेतली. काल झालेल्या शपथविधी सोहळ्यात पटेल यांनी भगवत गीतेवर हात ठेवून शपथ घेतली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ कार्यक्रमात देश-विदेशातल्या जनतेशी आपले विचार मांडणार आहेत. दर महिन्यात शेवटच्या रविवारी प्रसारित होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा ११९ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, NEWS ON AIR वेबसाईट आणि मोबाईल

ॲप वर देखील हा कार्यक्रम प्रसारित केला जाणार आहे. याशिवाय आकाशवाणी न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवर थेट प्रक्षेपण केलं जाईल. रात्री ८ वाजता या कार्यक्रमाचा मराठी अनुवाद आकाशवाणीवरुन प्रसारित होईल.

**<><><><><><>**

महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेत आज यूपी वॉरियर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. बंगळूरू इथं संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल. या स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सनं आत्तापर्यंत झालेल्या तीनपैकी दोन सामन्यात विजय मिळवला आहे तर, यूपी वॉरियर्सनं अद्याप एकही सामना जिंकलेला नाही त्यामुळे ते पहिल्या विजयाच्या प्रतिक्षेत असतील.

दरम्यान स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूवर ४ गडी राखून विजय मिळवला. पहिली फलंदाजी करताना बंगळुरुनं मुंबईसमोर विजयासाठी १६८ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं, हे लक्ष्य मुंबईनं १ चेंडू राखत पार केलं. या सामन्यात ३ खेळाडू बाद करणाऱ्या मुंबई इंडिअन्सच्या अमनजोत कौर हीला उत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरवलं गेलं.

**<><><><><><>**

चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत आज ब गटात ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात सामना होणार आहे. पाकिस्तानमध्ये लाहोर इथं हा सामना होईल. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी अडीच वाजता सामन्याला सुरुवात होईल.

स्पर्धेत काल कराची इथं झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं अफगाणिस्तानवर १०७ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात पहिली फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेनं, रायन रिकेल्टन याच्या एकदिवसीय क्रिकेटमधल्या पहिल्या शतकाच्या जोरावर ६ बाद ३१५ धावा केल्या. मात्र विजयासाठी ३२६ धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा संघ ४३ षटकं आणि ३ चेंडुंमध्ये

२०८ धावांमध्येच माघारी परतला. अफगाणिस्तानच्या वतीनं रहमत शहा यानं सर्वाधिक ९० धावांची खेळी केली. या सामन्यात शतकवीर रायन रिकेल्टन याला सामनावीराचा पुरस्कारानं सन्मानित केलं गेलं.

स्पर्धेत उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. दुबई इथं दुपारी अडीच वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारतानं आपल्या सलामीच्या सामन्यात बांग्लादेशावर विजय मिळवला होता, तर पाकिस्तानला आपल्या सलामीच्या सामन्यात न्यूझीलंड विरोधात पराभूत व्हावं लागलं होतं.

//<><><><><><>//